# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## लेखा व वित्त विभाग
मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,
Website – pcmcindia.gov.in
E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.लेखा/२९/कावि/६५ /२०२२ दिनांक :-०९/०५/२०२२

### परिपत्रक

विषय : कोविड-१९ संदर्भातील देयकांबाबत.

कोविड-१९ या महामारीच्या आजारावर उपाययोजनांसाठी महानगरपालिकेचा मागील २ वर्षामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये निधी खर्च झालेला आहे. कोरोना काळामध्ये वैद्यकीय विभाग, आरोग्य विभाग, मध्यवर्ती भांडार विभाग, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय व इतर सर्व मनपा रूग्णालये, सर्व क्षेत्रीय कार्यालये, वाहन दुरूस्ती कार्यशाळा विभाग, स्थापत्य विभाग, विद्युत विभाग इत्यादी विभागांकडून मनुष्यबळ पुरवठा, औषध व रसायने खरेदी, वाहन व्यवस्था, भोजन व्यवस्था, कोविड सेंटरवरील खर्च, मंडप व्यवस्था, विद्युत व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्था, फर्निचर खरेदी इत्यादी बाबींवर खर्च करणेत आलेला आहे. सद्यस्थितीमध्ये कोविड-१९ चा प्रसार कमी झाला आहे.तथापि असे निदर्शनास आले आहे की, काही विभागांकडून अद्यापही कोविड-१९ च्या तरतूदीमधुन खर्च केला जात असून सदरची देयके अदायगीकामी लेखा विभागाकडे सादर करणेत येत आहेत, त्यामुळे मनपाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असून नियोजित विकास कामांना पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. सबब, सर्व संबंधीत विभागांना सुचीत करणेत येते की, विभागांनी त्यांचेकडे असलेली कोविड-१९ विषयक देयके कोणत्याही परिस्थितीत दि.१५/०५/२०२२ पूर्वी लेखा विभागाकडे सादर करावीत. तदनंतर कोविड – १९ बाबतची देयके लेखा विभागाकडे स्विकारली जाणार नाहीत. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

०६/०५/२२

**( राजेश पाटील )**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति:- सर्व संबंधीत विभाग